प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

सप्टेंबर 26, 2016

**दि आर एस सहकारी बँक लि., मुंबई, महाराष्ट्र, ह्यांना आरबीआयकडून निदेश**

दि आर एस सहकारी बँक लि., मुंबई, महाराष्ट्र, ह्यांना, निदेश दि. जून 24, 2015 अन्वये, जून 26, 2015 रोजी व्यवहार संपल्यापासून सहा महिन्यांच्या कालावधीसाठी रिझर्व बँकेने निदेशांखाली ठेवले आहे. ह्या निदेशांची वैधता, डिसेंबर 21, 2015 रोजी, सहा महिन्यांसाठी (म्हणजे डिसेंबर 25, 2015 पर्यंत) वाढविण्यात आली होती व त्यानंतरही ती जून 22, 2016 रोजी आणखी तीन महिन्यांसाठी (म्हणजे जून 26, 2016 पर्यंत) वाढविण्यात आली होती. ह्याशिवाय ऑगस्ट 11, 2016 रोजी रक्कम काढावयाची मर्यादा रु.1,000/- वरुन रु.10,000/- करण्यात आली. सप्टेंबर 22, 2016 च्या आमच्या सुधारित निदेशान्वये, वरील निदेशांची वैधता आणखी सहा महिन्यांसाठी (म्हणजे सप्टेंबर 26, 2016 पासून मार्च 25, 2017 पर्यंत) पुनरावलोकनाच्या अटीवर वाढविण्यात आली आहे. संदर्भित निदेशातील इतर अटी व शर्तींमध्ये कोणताही बदल नाही. वरील सुधारणा विहित करणा-या आमच्या सप्टेंबर 22, 2016 च्या निदेशाची एक प्रत जनतेच्या माहितीसाठी सदरहू बँकेच्या कार्यालयात प्रदर्शित केलेली आहे.

रिझर्व बँकेने केलेल्या वरील सुधारणेचा अर्थ, त्या बँकेच्या आर्थिक स्थितीत सुधारणा झाली असल्याबद्दल रिझर्व बँकेचे समाधान झाले आहे असा घेतला जाऊ नये.

**अजित प्रसाद**
सहाय्यक सल्लागार

**वृत्तपत्र निवेदन : 2016-2017/766**